ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख ७ फेब्रुवारी, १९६२ | अंक ३

## विविध माहिती

**वीज केंद्रांतील नादुरुस्तीचा परिणाम**—म्हैसूर राज्यांतील जोग येथील जलविद्युत् केंद्रांत कांहीं बिघाड झाल्यामुळें विजेचा पुरवठा अपुरा पडूं लागला होता. बिघाडामुळें विजेची निर्मिति १८,००० किलोवॅटनें कमी झाली होती. पुरवठ्यांत व्यत्यय आल्यामुळें बंगलोर शहरांतील रस्त्यावरील दिवे कांहीं दिवस बंद ठेवण्यांत आले होते. भद्रावती येथील लोखंडाच्या व पोलादाच्या कारखान्यांवरहि अपुऱ्या वीज-पुरवठ्याचा परिणाम झाला.

**आणखी एक विनाशक बाँब**—१९७० च्या सुमारास आणखी एक मोठा विनाश घडवून आणणारा बाँब शास्त्रज्ञ निर्माण करूं शकतील, असा विश्वास एका अमेरिकन शास्त्रज्ञानें व्यक्त केला आहे. एखाद्या लहानशा ग्रहाला त्याच्या गतिपासून ढळण्यास लावावयाचे व पृथ्वीवर पाहिजे त्या ठिकाणीं त्याचा आघात करावयाचा, अशा स्वरुपाचा तो असेल. ही सर्व करणी नैसर्गिक घटनेसारखी सहज भासवितां येईल.

**कापडाच्या बाजारपेठेचें संशोधन**—भारत सरकारनें स्थापन केलेल्या कॉटन टेक्सटाईल फंड कमिटीतर्फे कापडाच्या बाजारपेठेचें संशोधन करणारी आणखी एक संस्था कानपूर येथें स्थापन करण्यांत येणार आहे. भारतामधील अशा प्रकारची ही चौथी संस्था होईल. संस्थेतर्फे मुझफरपूर येथील कापडाच्या बाजारपेठेचें संशोधन करण्यात येईल.

**हिंदी शास्त्रज्ञाला पारितोषिक**—आंतरराष्ट्रीय हवामान संघटनेतर्फे देण्यांत येणारें बक्षीस प्रथमच एका हिंदी शास्त्रज्ञाला देण्यांत आलें आहे. अहमदाबाद येथील फिजिकल रिसर्च लॅबोरेटरीचे संचालक डॉ. रामनाथन हे ह्या पारितोषिकाचे मानकरी आहेत. आंतरराष्ट्रीय हवामानाबद्दल महत्त्वाचें संशोधन करण्याबद्दल त्यांचा गौरव करण्यांत आला.

**हिंदी कंपन्यांना सरकारची विनंती**—परदेशांत व्यापारव्यवहार करणाऱ्या हिंदी कंपन्यांनीं स्वतःस लागणाऱ्या वस्तू जास्तींत जास्त प्रमाणांत भारतीय बनावटीच्या वापराव्या अशी विनंती भारत सरकारनें केली आहे. असें केल्यास हिंदी बनावटीच्या वस्तू लोकप्रिय होण्यास मदत होईल आणि परदेशीय चलनाची बचतहि होईल, असें सरकारचें म्हणणें आहे.

**इंडोनेशियासाठीं अणुभट्टी**—इंडोनेशिया व रशिया ह्यांच्या दरम्यान अणुभट्टीच्या पुरवठ्याबद्दल करार झाला आहे. कराराप्रमाणें रशिया इंडोनेशियाला एक अणुभट्टी पुरविणार असून ती आग्नेय आशियांतील सर्वांत मोठी असेल. अणुभट्टी उभारण्यासाठीं लागणारें कर्ज रशियाकडूनच मिळणार आहे. सध्यां भारत सोडून आशियांतील मागसलेल्या दुसऱ्या देशांत अणुभट्टी नाहीं.

**विजेच्या मोटर्सचा कारखाना**—काश्मीर राज्यांत विजेच्या मोटर्स व इतर कांहीं विजेचीं उपकरणें तयार करण्याचा एक कारखाना खाजगी मालकीच्या विभागांत काढण्यांत येणार आहे. कारखान्यासाठीं १ कोटी रुपये भांडवल लागेल. सुरवातीला कारखान्यांत ६५,००० विजेच्या मोटर्स तयार करण्यांत येतील. तो उभा राहिल्यावर १,००० कामगारांना रोजगार मिळेल.

**छोट्या शेतकऱ्यांना लागणारीं आवजारें**—मद्रास येथें भरविण्यांत आलेल्या राष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शनांत पश्चिम जर्मनीनें एक गाळा घेतलेला असून त्यांत छोट्या शेतकऱ्यांना लागणाऱ्या शेतीच्या आवजारांचे विविध नमुने ठेवण्यांत आले आहेत. त्यावरून जर्मनींत छोटी शेती, गुरांची पैदास आणि दुधदुभत्यांचा धंदा ह्या बाबतींत झालेल्या प्रगतीची चांगली कल्पना येतें. गाळा हिंदी शेतकऱ्यांनाहि उपयुक्त वाटण्यासारखा आहे.

**मद्रास राज्यांतील सहकारी साखर कारखाना**—मद्रास राज्यांतील साखरेचा पहिला सहकारी कारखाना मदुरा येथें काढण्यांत येणार आहे. दररोज १,००० टन उस गाळण्याची शक्ती असलेली यंत्रसामग्री कारखान्यांत बसविण्यांत येणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठीं १·४० कोटी रु. भांडवल लागेल. त्यांपैकीं २५ लाख रुपये भांडवल उस शेतकऱ्यांकडून जमविण्यांत येणार आहे.

**तीन वर्षांच्या बेशुद्धीनंतर मृत्यु**—ऑक्सफर्डमधील एक तरुणी मोटारअपघातांत सांपडून १९५८ सालीं जखमी झाली होती. ती नुकतीच मरण पावली. अपघात झाल्यावर तिच्या मेंदूला धक्का बसला होता व ती बेशुद्ध झाली होती. उपचारानंतर ती कांहींशी शुद्धीवर आली. पण तिला स्मृतिभ्रंश झाला होता. सुमारें १८ महिन्यांपूर्वी तिच्या हातांतील लग्नाची आंगठी काढून ती तिच्या प्रियकराला परत करण्यांत आली.

**ऋणकोंच्या मुक्ततेचा कायदा**—भरमसाठ व्याजाच्या दरानें कर्जे घेऊन जे ऋणको सावकारांच्या पाशांत अडकले असतील त्यांना मुक्त करण्याचा कायदा ब्रह्मदेशाच्या पार्लमेंटमध्यें मांडण्यांत येणार आहे. नवीन कायद्याप्रमाणें कांहीं ठराविक रक्कम परतफेडीचे पोटीं दिली असल्यास तो कर्जमुक्त होईल.

**आधी कळस, मग पाया**—ब्रिटनमधील कॉव्हेंट्री ह्या शहरांत एक गगनचुंबी इमारत बांधण्यांत येणार आहे. ह्या इमारतीची बांधणी नेहमींच्या पद्धतीनें न करतां, वरचे मजले आधीं बांधण्यांत येणार आहेत. वरच्या मजल्यापासून सुरुवात करून खालच्या मजल्यांची बांधणी होणार आहे. ह्या इमारतीला १० मजले राहतील.

**सूत कातण्याची सहकारी गिरणी**—दक्षिण अर्काट जिल्ह्यांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारी सुताची गिरणी काढण्यांत येणार आहे. गिरणीसाठीं लागणाऱ्या जागेची निवड अद्याप व्हावयाची आहे. गिरणींत १,२०० चात्या बसविण्यांत येणार आहेत. हातमागाच्या सहकारी संस्थांना लागणाऱ्या २० व ४० नंबराचें सूत गिरणींत काढण्यांत येणार आहे.

**न्यायमूर्तींचें सेवानिवृत्तीचें वय**—हायकोर्टांतील न्यायमूर्तींचें सेवानिवृत्तीचें वय ६० ऐवजीं ६२ ठरविण्याचा निर्णय मध्यवर्ती सरकारनें घेतला आहे. सरकारनें नेमलेल्या लॉ कमिशननें सेवानिवृत्तीचें वय ६५ असावें अशी शिफारस केली होती. ह्या निर्णयासंबंधी करण्यांत यावयाचा कायदा नव्या लोकसभेपुढें मांडण्यांत येईल असा अंदाज आहे.

**पक्षी-प्रेमिकांना इशारा**— पक्षी पाळणाऱ्यांना नॉर्वेच्या सरकारनें इशारा दिला आहे. आपला आवडता पक्षी जवळ घेऊन दूरचित्रवाणीचे कार्यक्रम पाहूं नका; त्यामुळें पक्षांच्या जिवाला धोका आहे असें जाहीर करण्यांत आलें आहे. दूरचित्र दर्शनाच्या कार्यक्रमांत ज्या ध्वनिलहरी बाहेर पडतात त्या पक्ष्यांना मारक असतात. माणसांना मात्र त्या ऐकूं येत नाहींत. ह्या ध्वनिलहरींमुळें १०० पक्षी मेल्याचें आढळून आलें आहे.

**रोल्यांना लागणाऱ्या कागदाची गिरणी**—मध्यप्रदेशांत होशंगाबाद ह्या ठिकाणीं रोल्यांना लागणारा कागद तयार करण्याची गिरणी काढण्यांत येणार आहे. कारखान्याची जागा निश्चित करण्यांत आली आहे. परंतु यंत्रसामग्री व इतर बाबींबद्दल ब्रिटनमधील एका कारखान्याशीं चाललेल्या वाटाघाटी पूर्ण झालेल्या नाहींत. त्यामुळें कारखान्याच्या कामास विलंब लागत आहे. तरी पण तो १९६४ मध्यें पुरा होण्याची शक्यता आहे.

**भारताची इजिप्तला मदत**—इजिप्तमध्यें नाइल नदीवर आस्वान येथें एक प्रचंड धरण बांधण्यांत येत आहे. धरण पुरें झाल्यावर जें पाणी अडविलें जाईल त्यामुळें इजिप्तच्या पुरातन संस्कृतीचे कांहीं अवशेष पाण्याखालीं जाणार आहेत. हे अवशेष हलवून दुसरीकडे उभारण्यासाठी संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या सांस्कृतिक उपसंघटनेनें ७ कोटी डॉलर्स मंजूर केले आहेत. ह्या कामाला भारतहि हातभार लावणार आहे.

**संयुक्त-अरब प्रजासत्ताकाला साह्य**—संयुक्त-अरब प्रजासत्ताक आणि रशिया ह्यांच्या दरम्यान आर्थिक साह्याचा करार झाला आहे. करारांतील शर्तीप्रमाणें रशिया प्रजासत्ताकाला १·३ कोटी पौंडांचें कर्ज देणार आहे. कर्जाचा उपयोग करून कैरो येथें एक वीज निर्मिति केंद्र, एक पोलादाचा कारखाना, एक डांबराचा कारखाना, इत्यादींची उभारणी करण्यांत येणार आहे.

**गुजरात चेंबरची इमारत**—गुजरात चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेच्या नव्या इमारतीचें उद्घाटन उत्तर प्रदेश राज्याचे माजी गव्हर्नर श्री. एच. पी. मोदी ह्यांच्या हस्तें झालें. इमारत बांधण्यासाठी ४ लाख रुपये खर्च आला आहे. चेंबरची स्थापना १९४९ सालीं झाली त्यावेळीं त्याची सभासद संख्या ५०० होती. आजची सभासद संख्या १,६०० आहे.

**शरावती वीज निर्मिति केंद्र**—म्हैसूर राज्यांतील शरावती जलविद्युत केंद्राच्या उभारणीसाठी मध्यवर्ती सरकारनें ६·५ कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. नियोजन समितीनें १९६२-६३ सालासाठी ह्या कामासाठी म्हणून ४२ कोटी रुपयांची रक्कम पूर्वीच मंजूर केली आहे. देशांतील वीजनिर्मिती केंद्रांची उभारणी पैशाच्या अभावीं खोळंबून न देण्याचें सरकारचें धोरण आहे.

**अमेरिकेची पाकिस्तानला मदत**—अमेरिकेनें पाकिस्तानला कर्जे देण्यास तयार असल्याचें जाहीर केलें आहे. सर्व कर्जांची मिळून रक्कम ७,९६,००,००० डॉलर्स आहे. ह्यापूर्वी थोडेच दिवस सहा राष्ट्रांचा एक गट व जागतिक बँक ह्यांच्या बैठकींत पाकिस्तानला ९४,५०,००,००० डॉलर्सचें कर्ज मंजूर करण्यांत आलें आहे. ह्या कर्जाचा उपयोग पाकिस्तानच्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी करावयाचा आहे.

**अधिकारी पाठविण्याची विनंती**—सीलोनचे दिवंगत पंतप्रधान श्री. सालोमन बंदरनायके ह्यांच्या खुनाच्या राजकीय बाजूची चवकशी करण्यासाठी एक कमिशन नेमण्यांत येणार आहे. ह्या कमिशनवर काम करण्यासाठी भारतानें व इजिप्तनें प्रत्येकी एक अधिकारी पाठवावा अशी विनंति पंतप्रधान श्रीमती बंदरनायके ह्यांनीं पं. नेहरू व प्रे. नासर ह्यांना पाठविलेल्या पत्रांत केली आहे.

**आंध्रमधील वीज-पुरवठ्यांत कपात**—आंध्र प्रदेश सरकारनें उद्योगधंद्यांना पुरविण्यांत येणाऱ्या विजेच्या शक्तींत २५ टक्क्यांची कपात करण्याचें ठरविलें असून ती तावडतोब अमलांत आणण्यांत येणार आहे. विजेचा पुरवठा कमी झाल्यामुळें राज्यांतील बऱ्याच कारखान्यांना आपल्या उत्पादनांत कपात करावी लागणार आहे. सिंगारानी कोळशाच्या खाणींतील कोळशाचें उत्पादन २० टक्के कमी होईल आणि त्यामुळें उष्णतेवर चालणाऱ्या वीजनिर्मिति केंद्रावरहि विपरीत परिणाम होईल. शिवाय रेल्वेला कोळशाची टंचाई जाणवूं लागेल. आंध्रमधील सिमेंटचें उत्पादन आज रोजीं २०० टनांनीं कमी होऊं लागलें आहे. कॉस्टिक सोडा व कागदाचे कांहीं कारखाने बांधून तयार आहेत. पण विजेच्या अभावीं ते सुरू करतां येणार नाहींत.

**पूर्व रेल्वेसाठी विजेचीं एंजिनें**—जपानच्या विटसुबिशी कंपनीकडे विजेच्या ५० रेल्वे एंजिनांची मागणी रेल्वे बोर्डानें नोंदविली आहे. ह्या एंजिनांची किंमत सुमारें ३ कोटी रुपये होईल. रेल्वे एंजिनांसाठी सर्व जगांतून टेंडर्स मागविण्यांत आलीं होतीं. कलकत्त्याच्या उपनगरांतील रेल्वे वाहतुकीसाठी तीं मुख्यतः वापरलीं जाणार आहेत.

**औषधांचे कारखाने**—रशियाच्या सहकार्यानें भारतांत औषधांचे ४ कारखाने काढण्यांत येणार आहेत. त्या सर्वांना मिळून ५२ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. ह्या कारखान्यांसाठीं रशियानें ८ कोटी रुबल्सचें कर्ज मंजूर केलेलें आहे. रुपायाच्या चलनांत हे कर्ज ९·५२ कोटी रुपयांचें भरेल. ह्या रकमेंतील कांहीं भाग रशियांतून आणावयाच्या यंत्रसामग्रीवर खर्च केला जाईल.

**दिल्लीमधील औद्योगिक प्रदर्शन**—दिल्लीमध्यें भरविण्यांत आलेलें औद्योगिक प्रदर्शन आशिआ खंडांतील सर्वांत मोठें प्रदर्शन होतें. उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत निरनिराळ्या देशांत झालेली प्रगति दाखविण्याच्या दृष्टीनें तें यशस्वी झालें असें सांगण्यांत येत आहे. प्रदर्शन पहाण्यासाठी ४५ लाख लोक आले होते, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**अणु बाँबचा हल्ला झाला तर**—जर्मनीमधील कांहीं मोठ्या शहरांतून अणु बाँबचा हल्ला झाला तर लोकांना सावध करणारे भोंगे बसविण्यांत आले आहेत. ब्रेमेन ह्या शहरांत ह्या भोंग्यांचा वापर करण्याचें प्रात्यक्षिक करण्यांत आलें. प्रात्यक्षिकांत प्रथम हवाई हल्ल्याची सूचना देण्यात आली व नंतर क्षणकाल थांबून अणुबाँबच्या स्फोटांमुळें उद्भवणाऱ्या विषारी धुळीचा इशारा देण्यांत आला.

# अर्थ

बुधवार, ता. ७ फेब्रुवारी, १९६२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## साखरेच्या धंद्यापुढील प्रश्नांचें स्वरूप

साखर-धंदा विकास मंडळाची बैठक दिल्ली येथें भरविण्यांत आली होती. मंडळाचे अध्यक्ष व भारताच्या अन्नखात्याचे संयुक्त चिटणीस श्री. एल. जी. राजवाडे ह्यांनीं मंडळापुढें केलेल्या भाषणांत साखरेच्या धंद्यापुढील प्रश्नांचें दिग्दर्शन केलें. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं ह्या वर्षी अधिकांत अधिक साखर निर्यात करण्याचे प्रयत्न होणार आहेत. हिंदमध्यें आतां साखरेवरील निर्बंध काढून टाकण्यांत आले आहेत. त्यामुळें देशांतील साखरेचा खप वाढत चाललेला आहे. १९६१–६२ सालांत साखरेचा खप २५ लाख टनांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. गेल्या वर्षी एकूण २,६८,००० साखर निर्यात करण्यांत आली. लवकरच आणखी ४५,००० टन साखर अमेरिकेला निर्यात करण्यांत येईल. अमेरिकेनें भारताकडून घ्यावयाच्या साखरेच्या हिश्शांत कपात केली नसती तर ही निर्यात गेल्या सालींच करण्यांत आली असती. जिनीव्हा येथें संयुक्त राष्ट्र-संघटनेची साखर परिषद् नुकतीच भरली होती. परंतु निरनिराळ्या देशांनीं किती साखर निर्यात करावी ह्याविषयीं करार करण्याच्या कामीं परिषदेला यश आलें नाहीं. त्यामुळें भारतानें करावयाच्या साखरेच्या निर्यातीवर आतां कोणतीहि बंधनें नाहींत. साखर कार-खान्यांची साखर निर्यात करण्याची शक्ति ही साखरेच्या उत्पादना-च्या खर्चाशीं कांहीं प्रमाणांत निगडित आहे ही गोष्ट उघड आहे. ह्या बाबतींत आंतरराष्ट्रीय साखर बाजाराशी सांगड घालावी लाग-णार आहे. तसें केल्यास हिंदी साखरेला परदेशीय बाजारपेठा लाभणें अशक्य नाहीं. सरकार व कारखानदार ह्यांचें सहकार्य मात्र झालें पाहिजे.

भारत सरकारनें साखरेचें वांटप व वहातूक ह्यांच्यावरील निर्बंध रद्द केलेले आहेत. त्याचबरोबर कारखान्यांत उत्पादन करण्यांत येणाऱ्या साखरेवर नियंत्रण ठेवलें आहे. १९६०–६१ मधील हंगामांत उत्पादन करण्यांत आलेली १२ लाख टन साखर शिल्लक होती. त्यांतच १९६१–६२ मधील उत्पादनाची भर पडणार होती. त्यामुळें साखरेचा मोठा सांठा विकला न जातां पडून राहण्याचा धोका उत्पन्न झाला. म्हणून सरकारला कांहीं उपायांची योजना करावी लागली. ह्या उपयांचा उपयोग होऊन पुढच्या नोव्हेंबरमध्यें नवीन हंगामास सुरवात होईल त्यावेळीं साखरेच्या खपाची परिस्थिति सुधारेल असें वाटण्यास जागा आहे. साखरेच्या उत्पादनावर घालण्यांत आलेलें नियंत्रण कांहीं हेतूनें घालण्यांत आलेलें आहे. साखरेची मागणी आणि पुरवठा ह्यांच्यामध्यें सध्यां समतोलपणा राहिलेला नाहीं. म्हणजेच मागणीच्या मानानें पुरवठा जास्त आहे. ही परिस्थिति बदलून मागणी व पुरवठ्यांत हळूहळू समतोलपणा आणण्यासाठी उत्पादनावर नियंत्रण घालण्यांत आलेलें आहे. साखरेचा धंदा, त्यांत काम करणारे लक्षावधी कामगार आणि उसाची शेती करणारा शेतकरी वर्ग, ह्या तिघांच्याहि हिताच्या दृष्टीनें उत्पादनावरील नियंत्रणें अतिशय आवश्यक आहेत. हीं नियंत्रणें घातलीं नसतीं तर उस पिकवणारे शेतकरी आणि कारखाने ह्यांच्यावर अनवस्था प्रसंग ओढवला असता. हा प्रसंग टाळण्याचा दुसरा मार्गच नव्हता व नाहीं. देशांत गरजेपेक्षा अधिक साखर निर्माण करण्यांत येत असल्यानें तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत नव्या कारखान्यांना परवाने देण्यांत येणार नाहींत.

## उसाच्या लागवडीवर मर्यादा घालण्याचा इशारा

मध्यवर्ती सरकारचे अन्न व शेतकी मंत्री श्री. स. का. पाटील ह्यांनीं निझामाबाद् जिल्ह्यांत काढण्यांत यावयाच्या एका सहकारी साखर कारखान्याच्या पायाचा दगड बसविला. ह्या कारखान्यासाठीं १·२० कोटि रुपये भांडवल लागणार आहे. ह्या प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं, देशांतील जमिनीपैकी अधिकाअधिक जमीन उसाच्या लागवडीकडे वळविण्याची प्रवृत्ति अलीकडे दिसून येत आहे. ही प्रवृत्ति अशीच वाढत गेली तर त्यामुळें अन्नधान्याच्या उत्पादनावर विपरीत परिणाम झाल्या-खेरीज राहणार नाहीं. गेल्या वर्षी साखरेचें उत्पादन त्याच्या मागील वर्षापेक्षा ६ लाख टनांनीं अधिक झालें. अर्थातच देशांत साखरेचें उत्पादन भरमसाठ झाल्यामुळें ती पडून राहूं लागली आहे. गेल्या कांहीं वर्षांत भारत परदेशाहून अन्नधान्याची आयात एकसारखी करीत आहे. परंतु हें असें नेहमीं चालणार नाहीं. अन्नधान्याची आयात संपूर्णपणें थांबविण्याचे प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत व येतील. अन्नधान्याच्या ऐवजीं पैसा देणारीं पिकें काढण्याची शेतकऱ्यांची वृत्ति त्यांनीं सोडून दिली पाहिजे. अन्नधान्याचें उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाठीशीं सरकार उभे राहील. पण, त्यांनीं अन्नधान्याच्या उत्पादनाचा खर्च खालीं आणून दाखविला पाहिजे. इतर देशांच्या मानानें भारतामधील शेतीच्या मालाच्या किंमती वरच्या पातळीवर असतात. ही गोष्ट विचित्र आहे. त्यामुळें भारताला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत उतरता येणें शक्य होणार नाहीं. परिणामीं हिंदी शेतकऱ्याला कांहीं मदत करणें अवघड होऊन बसतें. निर्यात करण्यासाठीं आर्थिक मदत देण्याचे उपाय योजले तर त्यामुळें देशाच्या अर्थव्यवस्थेला धोका उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाहीं.

## डेन्मार्क आणि भारत ह्यांच्यामधील व्यापार

युद्धोत्तर काळांत भारताचा पश्चिम युरोपांतील देशांशीं ज्या पद्धतीनें व्यापार चालू राहिला त्याच पद्धतीनें तो डेन्मार्कशींहि चालू राहिला. डेन्मार्क व भारत ह्यांच्यांत व्यापारी करार असा करण्यांत आलेला नाहीं. तथापि उभयता देशांतील आयात-निर्या-तीच्या नियमांच्या चौकटींत व्यापारी देवाणघेवाण मोकळेपणानें चालू आहे. भारताला आयात केलेल्या मालाची किंमत पौंडाच्या चलनांतच द्यावी लागते; रुपयांत किंमत देण्याचा करार करण्यांत आलेला नाहीं. आयातीवर किमान बंधनें ठेवण्याचें डेन्मार्कचें सर्व-साधारण धोरण आहे. त्या धोरणास अनुसरून भारताकडून येणाऱ्या मालावर निर्बंध नाहींत. डेन्मार्कचे आयातीवरील कर

मुख्य करीत आहेत. गेल्या १५ वर्षांत भारत व डेन्मार्क ह्यांच्यामधील व्यापार हळूहळू वाढत चाललेला दिसून येतो. १९५७ सालीं भारतानें आयातीवर बरींच कडक बंधनें घातलीं. त्यामुळें डेन्मार्ककडून येणाऱ्या आयातींत बरीच घट झाली. १९६० सालीं तर १९५७ मानानें निम्म्या किंमतीच्याच मालाची आयात डेन्मार्ककडून करण्यांत आली. १९५९ सालापासून भारताची डेन्मार्कला होणारी निर्यात बरीच वाढली. तेव्हांपासून डेन्मार्ककडून भारताला होणाऱ्या आयातीपेक्षां भारताची निर्यात वाढत आहे. भारत डेन्मार्ककडून जो माल आयात करतो त्यांत ७० टक्के माल यंत्रसामग्रीचा असतो. त्यांतहि विजेची यंत्रसामग्री अधिक असते. गौळवाड्यासाठीं लागणारीं आधुनिक उपकरणें मुख्यत: डेन्मार्कच भारताला पुरवितो. भारतामधील गौळवाड्यांत बसविलेल्या यंत्रसामग्रीपैकीं ५० टक्क्यांपेक्षा अधिक यंत्रसामग्री डेन्मार्कमध्यें बनविलेली आहे. उलटपक्षीं, भारत डेन्मार्कला मुख्यत: कापड, तागाचा व काथ्याचा माल, चहा, कातडीं, कच्ची तंबाखू पुरवितो.

## हा पाठलाग कशासाठीं?

ब्रिटनच्या लष्करांतील एक अधिकारी कॅप्टन डगलस नेलर ह्यांची आणि एका जरठकुमारीची गेल्या महायुद्धांत ओळख झाली होती. ही बाई ९१ वर्षांची होऊन नुकतीच वारली. तिनें आपल्या मृत्युपत्रांत कॅप्टन नेलर ह्यांना ५० हजार पौंड द्यावे असें लिहून ठेवलें होतें. पण, त्यांत एक गोम होती. कॅप्टन नेलर लग्न न करितां राहिले तरच त्यांना ते मिळावयाचे होते. कॅप्टन नेलर ह्यांना ५० हजार पौंड मिळणार ही बातमी विवाहेच्छु तरुणींत पसरल्यावर अनेक तरुणींनीं कॅ. नेलर ह्यांना विवाहाच्या मागणीची पत्रें घातलीं. पण ह्या तरुणींच्या तडाख्यांतून सुटण्यासाठीं ते आतां इटलींत पळून गेले आहेत. त्यांचें वय ४० वर्षांचें असून ते अविवाहित आहेत. हा पाठलाग पैशासाठीं कीं विवाहासाठीं, असा प्रश्न त्यांना पडला आहे.

## भिलई येथील कारखान्याचा विस्तार

भारतामधील सार्वजनिक मालकीच्या तीन पोलादाच्या कारखान्यांपैकीं भिलई येथील कारखान्याच्या विस्ताराचें काम चालू झालें आहे. रशिअन तज्ज्ञांकडून विस्ताराच्या कामासंबंधीं आलेला अहवाल भारत सरकारनें मंजूर केला आहे. भिलईच्या कारखान्याची पोलाद निर्माण करण्याची सध्याची शक्ति दरसाल १० लाख टनांची आहे. विस्ताराचें काम पूर्ण झाल्यावर ४ वर्षांच्या अवधींत ही शक्ति २५ लाख टनांपर्यंत वाढेल. विस्ताराची योजना अंमलांत आणण्याचें काम भिलईंत सर्वप्रथम सुरू होत आहे. बोकेरो येथें काढण्यांत यावयाच्या चवथ्या पोलाद कारखान्यासंबंधींच्या वाटाघाटी अमेरिकेशीं चालू असून त्यांत बरीच प्रगति झाली आहे.

## मिठाचा नवा कारखाना

जामनगरपासून २६ मैलांवर मीठ तयार करण्याचा कारखाना लवकरच काढण्यांत येणार आहे. कारखाना खाजगी मालकीचा राहील, व त्यासाठीं १५ लाख रुपये भांडवल लागेल. प्रथम ह्या कारखान्यांत दरसाल ५०,००० टन मीठ तयार होईल. पण हळूहळू १,२५,००० टन मीठ तयार होऊं लागेल.

## परदेशीय प्रवाशांच्या संख्येंत वाढ

भारतामधील प्रेक्षणीय स्थळें पाहण्यासाठीं परदेशाहून येणाऱ्या प्रवाशांच्या संख्येनें उच्चांक गांठला आहे. ह्या संबंधींचे नक्की आंकडे अद्याप मिळालेले नाहींत. परंतु सुमारें १,४१,००० प्रवासी आले असावेत. १९६० सालापेक्षा ही संख्या १८,००० नीं अधिक आहे. चालू वर्षीं त्यांची संख्या १,६०,००० वर जाईल असा अंदाज आहे. विमानवाहतूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांनीं प्रवाशांना आकर्षित करण्यासाठीं मोहीमच काढली आहे. विशेषत: अमेरिकेंतून अधिक प्रवासी येण्याचा संभव आहे. कारण, अमेरिकन लोकांना भारताविषयीं अजूनहि मोठें कुतूहल वाटतें. अमेरिकेंतील व ब्रिटनमधील मध्यमवर्गीय प्रवासी अजून फारसे येत नाहींत; येतात ते अतिशय श्रीमंतवर्गांतील असतात.

## येमेनच्या राज्याविषयीं आस्था

अरबस्थानांतील येमेन ह्या राज्याच्या विकासाबद्दल चार बडीं राष्ट्रें आस्था दाखवीत आहेत. तीं म्हणजे अमेरिका, रशिया, फ्रान्स आणि चीन. चीन येमेनमध्यें २३० किलोमीटर्सचा एक रस्ता बांधीत असून ह्या रस्त्याचें सर्व काम चिनी लोक करीत आहेत. चीनप्रमाणेंच अमेरिका, रशिया व फ्रान्स ह्या देशांनीं रस्ते बांधण्याच्या कामांत मदत केली आहे.

## राजकोट येथील नवा गौळवाडा

संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या मदतीनें राजकोट येथें उभारण्यांत यावयाच्या गौळवाड्याच्या कामाला प्रारंभ झाला आहे. माशिनरी उभारण्याचें काम लवकरच पूर्ण होईल. गौळवाड्यासाठीं बांधण्यांत आलेलें दुग्धालय व इतर इमारती ह्यांना १६ लाख रुपये खर्च आला आहे. दुग्धालयासाठीं उभारण्यांत यावयाची यंत्रसामग्री संयुक्त-राष्ट्र-संघटनेतर्फे भेट म्हणून मिळालेली आहे. सर्व गौळवाड्यासाठीं मिळून ८५ लाख रुपये खर्च येणार आहे.

## हिंदी संगीत अमेरिकेंत लोकप्रिय

सुप्रसिद्ध संगीतज्ज्ञ व सतारवादक पं. रविशंकर शुक्ल हे अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले होते. अमेरिकेंतील आपल्या दौऱ्याविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं, हल्लीं अमेरिकेंत हिंदी संगीताची आवड पूर्वीपेक्षां वाढली आहे. श्री. शुक्ल ह्यांनीं अमेरिकेंत सतारवादनाचे ४१ कार्यक्रम केले. त्यांपैकीं बहुतेक अमेरिकेंतील विद्यापीठांतून व कॉलेजांतून करण्यांत आले.

## १९६१ सालांतील चहाचा धंदा

१९६१ साल चहाच्या मळ्यांना चांगलें गेलें. चहाचें एकूण उत्पादन ७६ कोटी पौंड झालें. उत्पादनाचा हा उच्चांक आहे. उत्पादनापैकीं ४२·५ कोटी पौंड चहा निर्यात करण्यांत आला. मागल्या वर्षी ४० कोटी पौंड चहा निर्यात करण्यांत आला होता. ब्रिटन हें भारताच्या चहाचें एक मोठें गिऱ्हाईक असून १९६० पेक्षा १९६१ मधील ब्रिटनकडे होणारी निर्यात १·३ कोटी पौंडांनीं वाढलेली आहे. पश्चिम आशियांतील कांहीं देश आतांपर्यंत सिलोनकडून चहा घेत असत. त्यांनीं १९६१ सालीं कांहीं प्रमाणांत भारतीय चहाची आयात केली. तथापि चहाच्या निर्यातीच्या वाढीच्या मानानें परदेशीय चलनाच्या प्राप्तींत फारशी वाढ झाली नाही. जगांतील चहाचें उत्पादन वाढत असल्यामुळें किंमती घटत आहेत, त्याचा हा परिणाम आहे.

## बँकांच्या कर्जावरील व्याजांत आणि सर्व्हिस चार्जेसमध्यें वाढ

### ठेवींवरील व्याजाचा बिकट प्रश्न

इंडियन बँक्स असोसिएशननें आपल्या सभासद-बँकांच्या चेअरमनांची एक सभा बोलाविली असून ती दि. १६ फेब्रुवारी रोजीं मुंबई येथें भरेल. बँकांच्या कर्जावरील किमान व्याज-आकारणीबाबत सर्व बँकांचा नियोजित करार त्यांत चर्चिला जाईल. त्याचप्रमाणें, किमान सर्व्हिस चार्जेसबद्दलहि एकवाक्यता घडवून आणण्याचा प्रयत्न केला जाईल.

सध्या बँकांमध्यें ठेवींवर आकारावयाच्या कमाल व्याजाबद्दल एक करार अस्तित्वांत आहे. देना बँक, कॅनरा बँक, इंडियन बँक, इंडियन ओव्हरसीज बँक आणि युनियन बँक ह्या पांच बँकांनीं इंडियन बँक्स असोसिएशनला कळविलें आहे, कीं त्यांना आपले व्याजाचे दर पाव टक्क्यानें वाढविण्यास परवानगी मिळाली नाहीं, तर त्या करारांतून बाहेर पडणार आहेत. कराराच्या तीन वर्षांच्या अनुभवानंतर, व्याजाचे दर वाढविणें हाच जनतेकडून अधिक ठेवी आकृष्ट करण्याचा एकमेव मार्ग आहे, असें त्या बँकांचें मत झालें आहे. ह्या पांचहि बँकांना १९६१ हें वर्ष भर-भराटीचें गेलें आहे; पण ज्यास्त व्याजानें ठेवी स्वीकारतां आल्या असत्या तर अधिक किफायतशीर व्यवहार करतां आले असते, असें त्यांना वाटतें. बँकांचा ठेवींवरील व्याजविषयक करार म्हणजे स्वेच्छेनें स्वीकारलेलें बंधन होय. कोणतीहि बँक सहा महि-न्यांची नोटीस देऊन त्यांतून मोकळी होऊं शकते. मोठ्या आणि मध्यम आकाराच्या बँकांतील तेढीचा, प्रस्तुत पांच बँकांचा व्याजाच्या दरवाढीचा प्रयत्न हा दाखलाच होय.

सर्व्हिस चार्जेसमध्यें आणि कर्जावरील व्याजाच्या दरांत वाढ ह्याबाबत एकवाक्यता होणें विशेष अवघड नाहीं. पण, ठेवींवरील व्याजाचा प्रश्न अवघड असून तो बँकांच्या संघटनेची एकी कितपत टिकवतो हें आतां पाहावयाचें आहे.

---

## चोरीची नोट मूळ मालकाला परत

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

भवानीशंकर दवे ह्यानें १० मे, १९६१ रोजीं ५,००० रुप-यांचा एक चेक वटविला आणि त्याची त्याला बँकेनें ५,००० रुपयांची एक चलनी नोट दिली. ही नोट नंतर चोरीला गेली आणि अनेक हस्तांतरें होऊन (बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक, ह्यांचाहि त्यांत समावेश होता) ती कॅनरा बँकेंतून जैन ह्याला मिळाली. दवे ह्यानें प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटकडे अर्ज करून ही चोरीला गेलेली आपली नोट आपणांस परत मिळावी, अशी विनंती केली. ही नोट म्हणजे चोरीचा माल असल्याकारणानें मूळ मालकास ती परत दिली जावी, असा प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनें हुकूम केला. तेव्हां जैन ह्यानें हायकोर्टाकडे रिव्हिजन अर्ज केला.

"नोट हा चोरीचा माल होता हें सिद्ध झाल्यानंतर, ती नोट जैनच्या ताब्यांत रास्त मार्गानें आली असली, तरी तिचेवर त्याचा मालकी हक्क निर्माण होऊं शकत नाहीं; ती नोट मूळ मालकाला परत दिलीच पाहिजे" असें हायकोर्टानें सांगितलें, आणि रिव्हि-जन अर्ज नामंजूर केला. दवेला कॅनरा बँकेनें नोट दिली; त्यांत दवेचा कांहीं दोष नव्हता. तेव्हां दवेनें त्या बँकेला आपल्या नुकसानीची भरपाई करण्यास लावावें, असें हायकोर्टानें सुचविलें.

---

## केरळ सरकारची मदतीची मागणी

केरळ राज्यांतील पाणीपुरवठा व वीजनिर्मिति केंद्रांसाठी राज्य सरकारनें मध्यवर्ती सरकारकडे ६० लाख रुपयांच्या मदतीची मागणी केली आहे. हीं सर्व कामें तिसऱ्या पंचवार्षिक कार्य-क्रमाच्या पहिल्या वर्षीं सुरू करण्यांत यावयाचीं आहेत. ह्यापैकी २० लाख रुपयांची रक्कम छोट्या पाणीपुरवठा योजनावर खर्च होणार आहे.

---

## साखरेचा धंदा संकटांत सांपडणार ?

भारतामधील साखरेच्या धंद्यापुढें संकटाची परिस्थिति निर्माण होण्याचा रंग दिसतो. साखरेवरील नियंत्रणें रद्द झाल्यामुळें साखरेच्या किंमती उतरत आहेत. त्याचबरोबर साखरधंद्यासंबंधीं नेमलेल्या वेजबोर्डाच्या वेतनविषयक शिफारसी कारखान्यांना अंमलांत आणाव्या लागत आहेत. ही अडचणीची परिस्थिति पूर्व उत्तर-प्रदेशांतील साखर कारखान्यांना विशेष जाचक ठरत आहे. साखरेच्या उत्पादनाचा खर्च व विक्रीची किंमत ह्यांच्या-मध्यें सध्यापेक्षा अधिक फरक असण्याची आवश्यकता सांगण्यांत येत आहे.

---

## आर्थिक पाहणीचे निष्कर्ष

भावनगरमधील कापड गिरणी-कामगारांच्या राहणीची पाहणी करण्यांत आली असतां अशी माहिती मिळाली कीं सुमारें ४,००० कामगारांपैकी बहुतेक जणांना मोठीं कर्जे आहेत. कामगारांनीं गिरण्या, सहकारी पतपेढ्या, खाजगी सावकार, नातलग व स्नेही ह्यांच्याकडून उसने पैसे घेतलेले असून कर्जाची एकूण रक्कम १५ लाख रुपयांच्या आसपास आहे. ३० टक्के कामगार आपल्या वेतनापैकी ८० टक्के रक्कम मुद्दल व व्याजाच्या फेडीकडे लावतात.

---

## चालू लोकसभेंत ६२,२८५ प्रश्नांना उत्तरें

चालू लोकसभेचें आयुष्य ३१ मार्च, १९६२ रोजीं संपत आहे. ह्या लोकसभेनें एकूण ३१० सरकारी बिलें मंजूर केलीं. तह-कुबीच्या १,१७३ सूचनांची नोटीस देण्यांत आली होती, त्यांपैकी ४९१ सूचना सभागृहापुढें आल्या. फक्त तीन सूचना प्रत्यक्ष चर्चिल्या गेल्या. खाजगी सभासदांचीं दोन बिलें मंजूर करण्यांत आलीं. एकूण ६२,२८५ प्रश्नांना उत्तरें दिलीं गेलीं; पहिल्या लोकसभेंत ४३,४११ प्रश्नांना उत्तरें दिलीं गेलीं होतीं. उत्तरांवर अर्ध्या तासांच्या अशा १२८ चर्चा झाल्या.

---

## स्टॅटिस्टिकल आउटलाइन ऑफ इंडिया, १९६१

टाटा इंडस्ट्रीज प्रा. लि. च्या अर्थशास्त्रीय व आंकडेशास्त्रीय विभागानें तयार केलेली ही छोटी पुस्तिका, त्यापूर्वीच्या पांच पुस्तिकेप्रमाणेंच उपयुक्त तुलनात्मक आर्थिक आंकडेवारीनें परिपूर्ण आहे. १९५३ सालापासून दर दोन वर्षांनीं अशी पुस्तिका प्रसिद्ध करण्यांत येत आहे. प्रस्तुत पुस्तिकेंत पूर्वीच्या पुस्तिकेंतील माहिती अद्ययावत् आणली असून नव्या माहितीचीहि कांहीं कोष्टकें दिलेलीं आहेत. त्यामुळें, हिंदी आर्थिक परिस्थितीचें बदलतें चित्र नजरेसमोर उभें राहूं शकतें आणि तुलनात्मक अभ्यास सहज शक्य होतो.

---

## निजामाच्या मुलाला सेंट्रल बँकेचे डायरेक्टर केलें

हैद्राबादच्या निजामाचा ज्येष्ठ पुत्र प्रिन्स मुकर्रमजा बहादुर, ह्यास सेंट्रल बँक ऑफ इंडियानें डायरेक्टर बोर्डावर घेतलें आहे.

### दिल्लीमधील पुस्तकांचें प्रदर्शन

दिल्ली येथें कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांच्या प्रतिनिधींची शिक्षण परिषद् भरविण्यांत आली होती. त्या निमित्तानें भारतांत प्रकाशित करण्यांत आलेल्या पुस्तकांचे आणि शिक्षणासाठी वापरण्यांत यावयाच्या दृक्‌श्राव्य साधनांचें एक प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. हीं साधनें भारतांतच बनविण्यांत आलेलीं होतीं. प्रदर्शनांत १,६०० पुस्तकें ठेवण्यांत आलीं होतीं. त्यांत इंग्रजी, हिंदी व इतर देशी भाषांमधील पुस्तकें होतीं. पुस्तकांचे ९ विभाग पाडण्यांत आले होते, ते असे:—मुलांसाठी पुस्तकें, पाठ्य पुस्तकें, सामाजिक शिक्षणासंबंधीं पुस्तकें, जुने ग्रंथ, चित्रांचीं पुस्तकें, कलाविषयक पुस्तकें, संदर्भ ग्रंथ, शिक्षणविषयक मासिकें आणि दृक्‌श्राव्य साधनें.

### यंत्रसामग्रीच्या उत्पादनावर भर

भारताच्या औद्योगिक विकासासाठी जरूर असणारी यंत्रसामग्री देशांतच तयार करण्यावर भारत सरकार भर देणार आहे, असें मध्यवर्ती सरकारचे उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा ह्यांनीं जाहीर केलें आहे. अंबाला येथें बोलतांना ते म्हणाले की, १९६१ सालीं भारतांत २०५ कोटी रुपये किंमतीची यंत्रसामग्री तयार करण्यांत आली. तीन वर्षांपूर्वी फक्त १० कोटी रुपये किंमतीची यंत्रसामग्री तयार करण्यांत आली होती. नजीकच्या भविष्यकालांत आणखी १,५०० कारखान्यांची उभारणी करण्यांत येणार आहे. त्यांना लागणारी ४५० कोटी रुपयांची यंत्रसामग्री येत्या दोन वर्षांत तयार करण्याचा सरकारचा विचार आहे. यंत्रसामग्रीच्या उत्पादनाच्या बाबतींत जसजशी प्रगति होईल तसतशी परदेशीय चलनाच्या बचतींत वाढ होत जाईल.

### गणिततज्ज्ञांच्या चुकीनें युद्धाची शक्यता

अमेरिकन असोसिएशन फॉर दि अॅड्व्हान्समेंट ऑफ सायन्स ह्या संघटनेनें आपला वार्षिक अहवाल प्रसिद्ध केला आहे. ह्या अहवालांत अमेरिकेंतील ७ प्रमुख शास्त्रज्ञांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं अग्निबाणांच्या कार्यक्षमतेबद्दल विजेच्या यंत्रांच्या साह्यानें गणित करण्यांत येतें. ह्या गणितांत चूक झाली तर चुकीचा निर्णय घेतला जाऊन अणुयुद्ध सुरू होण्याची शक्यता आहे.

### नत्रयुक्त खतांच्या कारखान्याचा विस्तार

फर्टिलायझर्स अँड केमिकल्स लि., त्रावणकोर ह्या कारखान्याच्या विस्ताराचा तिसरा टप्पा भारत सरकारनें मंजूर केला आहे. विस्ताराच्या कामासाठी ८·५ कोटी रुपये लागतील. ते उभारण्यासाठी कंपनीनें आपलें अधिकृत भांडवल ५ कोटी रुपयांनीं वाढविण्याचें ठरविलें आहे. कंपनीचें पहिलें भांडवल ५ कोटी रुपयांचें होतें. ह्या कारखान्यांत भारत सरकारचें कांहीं भागभांडवल असून आणखी भाग-भांडवल घालण्याची तयारीहि आहे. सध्यां कारखाना दरसाल २०,००० टन नत्रयुक्त खत तयार करतो. विस्ताराचें काम पूर्ण झाल्यावर दरसाल ७०,००० टन खत तयार होईल. त्याशिवाय इतर प्रकारच्या खताच्या उत्पादनांतहि थोडीफार वाढ होईल.

### अमेरिकेंतील मोटारींचें उत्पादन

१९६१ सालापेक्षा १९६२ सालीं अमेरिकेमधील मोटारींचे कारखाने १० लाख अधिक मोटारी तयार करतील असा अंदाज करण्यांत आला आहे. १९६२ सालीं ६४ लाख ते ६८ लाख मोटारींचें उत्पादन होईल. १९६१ मध्यें ५५ लाख मोटारी तयार होतील, असा अंदाज करण्यांत आला होता.


सेवा आणि सुरक्षितता
यांसाठी
दि बेळगांव बँक लिमिटेड
रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव
स्थापना ) (शेड्यूल्ड बँक) ( १९३०

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रुपये | ८,००,००० |
| गंगाजळी | रुपये | ४,८६,००० |
| एकूण ठेवी | रुपये | १,७५,००,००० चे वर |

बँक अल्प मुदतीच्या ठेवी
आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारते.
—आजच चौकशी करा—
होम सेव्हिंग्ज डिपॉझिटवर व्याज ३%
एक ते पांच वर्षे मुदत ठेवींवर व्याज ४% ते ५%
सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
अ. रा. नाईक,
बी. ए., बी. एससी., एलएल्. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर



दि मिरज स्टेट बँक, लि.
हेड ऑफिस : मिरज
शेड्यूल्ड बँक : स्थापना १९२९

| | |
|---|---|
| वसूल शेअर भांडवल | : रुपये सहा लाख |
| खेळतें भांडवल | : रुपये एक कोट |
| रिझर्व्ह फंड व इतर फंड | : रुपये सात लाख |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
मुदत ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर
१ वर्ष ३¾% ३ वर्षे ४½%
२ वर्षे ४% ४ वर्षे ४¾%
५ वर्षे ५%
हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची उत्कृष्ट व्यवस्था.
बँकेच्या शाखा: सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.
श्री. एन्. पी. कानिटकर, अॅड्व्होकेट, चेअरमन. | के. डी. शिराळकर, मॅनेजर.

## नोकराची मालकाशीं वागणूक

लेखक : श्री. श्री. वा. काळे

( सेवकधर्माचें कौटिल्यानें २,००० वर्षापूर्वी केलेलें विवेचन आजहि लागू आहे. फारतर तपशिलांत स्थल-काल-परिस्थित्य-नुसार थोडा फरक आढळेल, एवढेंच. वाचकांनीं तें मनन करण्या-सारखें असल्यामुळें संक्षेपानें प्रस्तुत लहानशा लेखांत तें ग्रथित केलें आहे. )

### मर्जी राखण्याचें महत्त्व

महाराष्ट्रीय लोक आपल्या कामांत तत्पर असले तरी त्यांचा नोकरीमध्यें उत्कर्ष होत नाहीं; इतर लोकच त्यांच्यापुढें जातात; महाराष्ट्रीयांची लायकी असूनहि त्यांना योग्य त्या वरिष्ठ वा कनिष्ठ जागा मिळत नाहींत अशी तक्रार नेहमीं केली जाते. कार्यतत्परता हा गुण नोकरीला आवश्यक असला तरी त्याबरोबरच इतरहि कांहीं गुणांची जरूरी असते. सेवकधर्म म्हणून जो कांहीं मानला जातो तो अत्यंत गहन असून त्या बाबतींत आपण निरुत्साही असतो असें म्हणणें चूक ठरणार नाहीं. नोकरी सोडायची तयारी नाहीं आणि सेवावृत्तिहि धड नाही, अशा परिस्थितींत सेवकांची कुचंबणा झाल्याविना राहात नाहीं.

राजाशीं वागतांना सेवकानें कोणतें तारतम्य बाळगावें हें कौटिल्यानें जें २,००० वर्षांपूर्वी सांगून ठेवलें आहे तें आजहि आपल्या वरिष्ठांशीं कसें वागावें हें शिकण्यास उपयोगी पडण्या-जोगें आहे. कारण राजा असो नाहींतर मॅनजिंग एजंट किंवा मॅनेजर असो; साहेब असो किंवा त्याचा पी. ए. असो; मनुष्यस्वभाव हा सारखाच असणार; अधिकार आणि सत्ता ह्यांच्याशीं संबंध येणाऱ्या सेवकांना सारखाच अनुभव येणार. हल्लींच्या सरकारी अधिकाऱ्यांच्या बाबतींतहि कौटिल्याचीं वचनें लागू पडतील इतकीं तीं त्रिकालाबाधित आहेत. आजचे सरकारी, निमसरकारी अधिकारी वा उद्योगपति राजाइतके लहरी असूं शकत नाहींत, अन्याय करूं शकत नाहींत, लोकशाहींत अन्याय दूर करून घेण्याला पुष्कळच वाव असतो, हें सर्व जरी खरें असलें तरी इतराजीचे दुष्परिणाम टळूं शकत नाहीत; ते प्रत्यक्षाप्रत्यक्ष भोगावेच लागतात. पूर्वी राजा किंवा संस्थानिक नोकराचें आणि प्रसंगीं त्याच्या कुटुंबाचें सुद्धा वाटोळें करूं शकत; म्हणून तेथील गैरमर्जी झालेले नोकर देशत्याग करीत. हल्लींचे नोकर भरकचेरींत निदर्शनें करतात वा आपली दाद लावून घेण्याकरितां संप करतात. त्याबद्दल त्यांचा पगार जरी कापला जात नसला तरी साहेबांच्या गैरमर्जीची चुणूक त्यांना या ना त्या-प्रकारें जाणवल्याशिवाय राहात नाहीं. नोकराचें नुकसान अन्य मार्गें सुद्धा होऊं शकतें वा करतां येतें. बढतीच्या वेळीं तर साहे-बाच्या खुषीला विशेष महत्त्व असतें. त्याच्या गुप्त नोंदी (Confidential) वरच तर हाताखालील नोकराचें भवितव्य अवलंबून असतें. जो नोकर वरिष्ठांस खुष करूं शकत नाहीं त्याला बढती मिळणें अवघड होऊन बसतें. ह्याचा अर्थ, धन्याची किंवा वरिष्ठांची मर्जी राखण्याचें महत्त्व हल्लींच्या लोकशाहीच्या जमा-न्यांत सुद्धा कायमच आहे आणि तें कायमच राहणार. ह्या दृष्टीनें कौटिल्याच्या विवेचनापासून होणाऱ्या मार्गदर्शनाचा विचार प्रत्येकानें करणें आवश्यक ठरेल. आपापल्या नोकरीच्या परि-स्थितीला तें विवेचन लागू करून पाहिलें म्हणजे झालें.

### वागण्या-बोलण्याचे कांहीं नियम

राजासंनिध राहणाऱ्यांची वागणूक कशी असावी ह्याचें विवेचन कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्रांत उत्कृष्ट रीतीनें केलें आहे. तें सर्वच नोकरवर्गाला मार्गदर्शक होईल. राजा सांगेल त्या जागेवर जाऊन राहावें. स्वतः पाहिल्याशिवाय कोणतीहि गोष्ट सांगू नये. मोठ्यानें बोलूं नये. हसण्यासारखें कांहीं झालें तरी हसूं नये. मोठ्यानें ढेकर देऊं नये. खाकरूं नये. दुसरा बोलत असतांना त्याचें बोलणें संपल्याशिवाय बोलूं नये. सार्वजनिक चर्चा चालली असतांना परस्परांत बोलणें करूं नये. राजाइतका चांगला पोषाक करूं नये. पोषाक विदूषकी नसावा. कामावरून दूर झालेल्या लोकांशीं सहवास ठेवूं नये. अगदीं एकलकोंडे राहूं नये. पण मोठा जमावहि आपल्याभोंवतीं जमवूं नये. राजानें विचारल्यास जें गोड व हितकर असेल तेंच सांगावें. अहितकर गोड असलें तरी बोलूं नये. राजानें आक्षेप घेतला असतां उत्तर न देतां स्वस्थ बसावें. राजाला नावडत्या गोष्टी केव्हाहि वर्णू नयेत. राजाच्या मर्जीविरुद्ध वर्तन करणारे लोक आपल्या कामांत कितीहि दक्ष असले तरी ते राजाला अप्रिय होतात. राजा हसला म्हणजे आपण हसावें, तरी पण मोठ्यानें हसूं नये. सुज्ञ माणसानें प्रसंगीं स्वतःचें रक्षण अगोदर करावें.

### मर्जी ओळखण्याच्या तऱ्हा

राजाची मर्जी कशी ओळखावी ? आपलें दर्शन घडल्यानें तो खूष झाला, आपलें भाषण ऐकलें, आपणांला आसन दिलें, एकां-तांत भेट दिली, आपल्यासंबंधीं शंका घेण्याजोगी असली तरी घेतली नाहीं, आपणांशीं संभाषणांत आनंद मानला, हितकारक भाषण कसेंहि असलें तरी ऐकलें, हातानें स्पर्श केला, संकटकालीं आपला सल्ला विचारला, म्हणजे आपणावर राजाची मर्जी आहे असें समजावें. ह्याच्या उलट असलें ( उदाहरणार्थ, त्यानें आपणाला पाहिल्याबरोबर राग दर्शविला, भाषणास मनाई केली, आसन दिलें नाहीं, ढुंकून पाहिलें नाहीं, आपल्याशीं फक्त पुटपुटला, दुसऱ्या कोणाचें अभिनंदन केलें, दुसऱ्या कोणाचे तसेच दोष असतील त्याची निंदा केली, आपल्या वैऱ्याची स्तुति केली, चांगलीं कृत्यें केलीं असतील त्याकडे लक्षहि दिलें नाहीं, दुष्कृत्यें वारंवार आठ-वलीं, आपल्याकडे पाठ करून बसला, भेट झाली कीं लागलीच निरोप दिला ) म्हणजे राजाची मर्जी नाहीं असें समजावें. राजाच्या संनिध असणाऱ्या लोकांच्या वागण्यांत आपल्याविषयीं काय फेरबदल होतो हें नेहमीं सूक्ष्म तऱ्हेनें लक्षांत आणावें. अशा तऱ्हेनें विचारपूर्वक वागल्यामुळें झालेल्या संकटमुक्तीचीं अनेक उदाहरणें कौटिल्यानें दिलीं आहेत.

### गैरमर्जीचे संकेत

राजाच्या बागेतील माळ्यानें बेपर्वाईनें अंगावर पाणी उडविलेलें पाहून एका प्रधानानें राजाचा कोप जाणला. क्रौंच पक्षी रोजच्या-प्रमाणें न जातां उलटा गेला एवढ्यावरून एका पंडितानें राजाची मर्जी खप्पा झाली असल्याचें ओळखलें. आपल्या अध्यापकाला राजपुत्रानें रोजच्याप्रमाणें आसन न देतां आज छाटी वाळलीच नाहीं असें सांगितलें; यावरून अध्यापकानें राजाची गैरमर्जी झाल्याचें जाणून काम सोडून दिलें. एक आचार्य नेहमींप्रमाणें राजवाड्यांत येत असतां हत्तीनें सोंडेतील पाण्याचा फवारा त्यांच्यावर उडवला. ह्याचा राजाचें मन आपल्याविषयीं कलुषित झालें असल्याचा कयास आचार्यानें केला. दुसऱ्या एका आचार्या-वर वाड्याच्या दारांतील नेहमींचा कुत्रा एकाएकी भुंकूं लागला. त्यावरून त्यानें राजाची गैरमर्जी झाल्याचें ताडलें.

### सेवा आणि स्वाभिमान यांचा मेळ

धन्याचा कोप कशामुळें झाला व आपलें कोठें चुकलें याचा

शोध करून आपलें वर्तन सुधारावें हा सेवकधर्म आजहि लागूं आहे; फारतर त्याचा तपशील बदलेल एवढेंच. हुशारी, मेहनत, कामांत चोखपणा, इ. च्या जोडीला धन्याची मर्जी संपादण्याचें व राखण्याचें कसब अंगीं असावयाला पाहिजे. ह्या दृष्टीनें काम सांगणारांचाहि सेवकानें अभ्यास केला पाहिजे. कचेरीबाहेरहि धनी नोकराशीं धन्यासारखाच वागण्याचा प्रयत्न करतों; अशा वेळीं स्वाभिमानी सेवकाची कुचंबणा होते. त्यांतूनहि हुशारीनें मार्ग काढला पाहिजे. सेवा आणि स्वाभिमान ह्यांतील तारतम्य जाणण्याचा हा प्रश्न आहे. 'निःस्पृहस्य तृणं जगत्' हें खरें आहे; पण 'गरजवंताला अक्कल नसते' हेंहि कांहीं खोटें नाही. स्पष्टवक्तेपणा आणि सेवकधर्म ह्यांची विसंगति ध्यानांत बाळगायलाच हवी. अपवाद हे राहणारच; त्यांचा विचार स्वतंत्र आहे. समर्थ रामदासांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, "स्वामींनी जे जे बोलावे, तेंचि सेवकीं प्रतिष्ठावे। श्रेष्ठापुढें शहाणपण, हेचि केवळ मुर्खपण ॥ कळेल तरी सांगू नये, वडिलांसीं बुद्धी शिकवूं नये। समर्थाचे मनोगत, तैसेचि वर्तन उचित ॥ मनोगत राखता श्रेष्ठ वोळे, मनोगत चुकता खवळे। ऐसे जयासि न कळे तो जाणतां कैसा?॥"

"उद्यम", जानेवारी, १९६२


## ताडीपासून साखर बनविण्याचा कारखाना

ताडीपासून साखर बनविण्याचा एक कारखाना काढण्याचा विचार पंजाब सरकार करीत आहे, असें राज्य सरकारचे अर्थमंत्री श्री. गोपिचंद भार्गव ह्यांनीं जाहीर केलें आहे. हा कारखाना चालविण्याचें काम राज्याच्या खादी आणि ग्रामोद्योग संघाकडे सोंपविण्यांत येणार असून त्यांत ५० लोकांना रोजगार मिळेल. ताडीपासून साखर तयार करणारा राज्यांतील हा पहिलाच कारखाना असेल. त्यानंतर राज्याच्या इतर भागांतहि असेच कारखाने काढण्यांत येण्याचा संभव आहे.

## पूर्व पाकिस्तानांत पोलादाचा कारखाना

पूर्व पाकिस्तानांत चितगांव येथें पोलादाचा कारखाना काढण्याचा निर्णय पाकिस्तान सरकारनें घेतला आहे. ह्या कारखान्यासाठी जपानची मदत घेणार असून त्यासाठी १३·३२ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. कारखान्यासाठी लागणारें कच्चें लोखंड आयात करण्यांत येणार आहे. एकूण भांडवलापैकी ८·७ कोटी रुपयांचें भांडवल परदेशीय चलनाच्या रुपांत लागणार आहे आणि तें जपानकडून मिळणाऱ्या कर्जांतून उभें करण्यांत येणार आहे. कारखान्याची उभारणी पाकिस्तानच्या औद्योगिक विकास कॉर्पोरेशनतर्फे करण्यांत येणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★


किर्लोस्कर
लोखंडी नांगर
भारी, मध्यम प्रतीच्या व रेताड जमीनीच्या सर्वोत्कृष्ट नांगरटीसाठीं निरनिराळ्या बनावटीचे लहान मोठे नांगर तयार होतात. आपल्या जमीनीच्या मगदुरा प्रमाणे योग्य अशा नांगराची निवड करा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी
(जि सांगली)

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना : १९४५] मुगभाट, मुंबई-४. [टेलिफोन ७२१००
बचतीच्या आकर्षक योजना
(१) स्पेशल सेव्हिंग — व्याजाचा दर २॥ टक्के
(२) त्रैवार्षिक मासिक बचत — " ३। "
(३) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें — " ५ "
मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.
मॅनेजर—ना. शं. कानिटकर

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.